# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.02.2025** **वारःगुरुवार**

---

१. छत्रपती शिवरायांची जयंती देशभर उत्साहात साजरी,

२. गड किल्ल्यांवरील अतिक्रमणं काढण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

३. ‘जय शिवाजी-जय भारत’ पदयात्रांमुळे अवघे राज्य दुमदुमले,

४. विखंडन युगातली आर्थिक लवचिकता आणि पुनरुत्थान या मध्यवर्ती संकल्पनेवर पुण्यात आजपासून नववा आशिया आर्थिक संवाद आणि

५. मराठी साहित्ययात्रींना घेऊन रेल्वेगाडी दिल्लीकडे रवाना.

**<u>शिवजयंती</u>**

हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती काल देशभरात अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. यानिमित्त भव्य मिरवणुका, शोभायात्रा, व्याख्यानं, आदी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराजांच्या कार्यातून एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना त्यांनी संदेशातून व्यक्त केली.

शिवाजी महाराजांचं जन्मस्थळ असलेल्या जुन्नर तालुक्यातील किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव उत्साहात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. शिवाजी महाराजांचे राज्यातील १२ गड किल्ले जागतिक वारसास्थळाचा दर्जा मिळण्यासाठी नामांकनाकरिता निवडले असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. यासाठी कृतिदल तयार करण्यात

आलं असून किल्ल्यांवरील सर्व अतिक्रमणं काढण्यात येतील, असंही त्यांनी सांगितलं. प्रारंभी शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायला. त्यानंतर पोलीस पथकानं तीन फैरी झाडून मानवंदना दिली.

**पदयात्रा**

शिवजयंतीनिमित्त राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये काल 'जय शिवाजी-जय भारत' पदयात्रा काढण्यात आल्या. युवक, विद्यार्थी, अधिकारी, नागरिक यांच्या सहभागामुळे सर्व परिसर दुमदुमून गेला होता. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालय तसंच महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमानं या पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. पुण्यात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही पदयात्रा काढण्यात आली. "छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार जीवनामध्ये स्वीकारण्याचा संकल्प युवकांनी करावा", असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी याप्रसंगी केलं. तर विकसित भारताचा संकल्प घेण्यासाठी 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रा असल्याचं केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यावेळी म्हणाले. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा प्रबोधिनी, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येनं या पदयात्रेत सहभाग घेतला. ऐकूया याबाबतचा सविस्तर वृत्तांत....

**व्हॉईस कास्ट स्क्रिप्ट**

**राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये काल 'जय शिवाजी-जय भारत' पदयात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आल्या. नांदेडमध्ये "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा काढण्यात आली. यावेळी भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचं वाचन करण्यात आलं. यवतमाळ तसंच वाशिम इथं काढलेल्या पदयात्रेत नागरीक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. सोलापुरात काल चार जणांनी हुतात्मा पुतळ्यासमोर सलग १९ तास १९ मिनिटे १९ सेकंद दांडपट्टा फिरवून शिवरायांना अभिवादन केलं. परभणीत पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला. पोलिस दलातील सुसज्ज यंत्रणेतील वाहने, शस्त्र,पोलिस अधिकारी,कर्मचारी सहभागी झाले होते. साताऱ्यात किल्ले अजिंक्यतारा परिसर काल रात्री हजारो मशालींनी उजळवून टाकण्यात आला. रत्नागिरी, गडचिरोली, सांगली, धाराशिव, नंदुरबार, लातूर अकोला, तसंच सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथं जय शिवाजी जय भारत पदयात्रा मोठ्या उत्साहात निघाल्या होत्या. नागपूरमध्ये पालकमंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखविला. नाशिकमध्ये शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे जय शिवाजी जय भारत पदयात्रेत सहभागी झाले. छत्रपती संभाजीनगरमध्ये क्रांती चौक परिसरातून 'जय शिवाजी-जय भारत' पदयात्रा काढण्यात आली. मंत्री अतुल सावे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, यांच्या हस्ते शिव प्रतिमेचं पूजन करुन यात्रेला सुरुवात करण्यात आली. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या राज्यभरातील प्रतिनिधिंसह पुण्याहून स्वाती महाळंक.**

**<u>शिवसृष्टी</u>**

पुण्यात आंबेगावमध्ये उभारल्या जात असलेल्या शिवसृष्टीच्या द्वितीय टप्प्याचं लोकार्पणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या  हस्ते काल करण्यात आलं. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीनं आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या मूळ संकल्पनेतून साकारत असलेली शिवसृष्टी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचं एक केंद्र ठरणार असून, शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्याच्या उभारणीसाठी ५० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी  याप्रसंगी केली.

**<u>संमेलन</u>**

सरहद, पुणेद्वारे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचं ९८ वावं साहित्य संमेलन यंदा २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान नवी दिल्ली इथं होत आहे. त्यानिमित्त 'मराठी साहित्ययात्री संमेलन' हे आकर्षण असलेली साहित्यप्रेमी रसिकांची पहिली रेल्वेगाडी काल पुणे स्थानकावरून रवाना झाली. ऐकूया त्याबाबतचा हा वृत्तांत...

**<u>व्हॉईस कास्ट</u>**

**साहित्य संमेलन हा तमाम मराठी जनांचा अभिमानाचा आणि कुतुहलाचा विषय. त्यातून 'दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा' अशी वर्षानुवर्षांची ख्याती असणाऱ्या मराठी मनांचा हा ९८ वाव्वा सारस्वताचा उत्सव यंदा राजधानी दिल्लीमध्ये होत असल्यानं त्याला आगळंच महत्त्व आहे. त्या अनुषंगानं आकाराला येत असलेल्या अनेक अभिनव उपक्रमांपैकी एक म्हणजे पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवासादरम्यान आयोजित करण्यात आलेलं पहिलंवहिलं 'मराठी साहित्ययात्री संमेलन'. शिवछत्रपतींच्या गडकोटांच्या नावांनी सजलेल्या डब्यांचा अंतर्भाव असलेल्या, दिल्लीला जाणाऱ्या महान सेनानी महादजी शिंदे रेल्वेगाडीला काल  पुणे रेल्वे स्थानकावर मराठी भाषामंत्री उदय सामंत यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचं पूजन आणि  महाराष्ट्र गीताच्या सामूहिक गायनानंतर पुण्यातून रेल्वे दिल्लीकडे वाजतगाजत रवाना झाली. या प्रवासात रेल्वेच्या डब्यांमध्ये रंगणाऱ्या या संमेलनाचे स्वागताध्यक्ष उदय सामंत असून अध्यक्ष शरद तांदळे आहेत. सामंत या विशेष रेल्वेद्वारे साहित्यिकांच्या बरोबर प्रवास करत आहेत. राज्यातील विविध गावा-गावांमधून आलेले साहित्यिक, युवक, लोककलाकार, स्टँडअप कॉमेडियन्स, समाजमाध्यमांवरील प्रभावी व्यक्तिमत्त्व तसेच शाहिरी आणि भजनी मंडळे यांच्या सहभागामुळे हा प्रवास आता अमृतातेही पैजेसी जिंकणाऱ्या मराठा बोलांनी गजबजून जाणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी नीतीन जळूकर यांच्यासह पुण्याहून स्वाती महाळंक.**

**<u>आशिया</u>**

विखंडन युगातली आर्थिक लवचिकता आणि पुनरुत्थान या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित नववा आशिया आर्थिक संवाद आजपासून तीनदिवस पुण्यात आयोजित केला जात आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता आणि स्वयंचलन तसंच वातावरण बदलाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम या विषयावर त्यात सखोल चर्चा होणार आहे. भारतासह जगभरातले राजकीय नेते, वरिष्ठ सनदी अधिकारी, धोरणकर्ते, उद्योग तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ सहभागी होणार आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात काल कराची इथं न्यूझीलंडनं पाकिस्तानला ६० धावांनी हरवलं. न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करताना ३२० धावा केल्या होत्या. भारताचा पहिला सामना आज दुबईमध्ये बांगलादेशविरुद्ध होणार आहे.

**<u>रेगे निधन</u>**

मुंबई क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि मार्गदर्शक  मिलिंद रेगे यांचं काल हृदयविकाराच्या झटक्यानं मुंबईत निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. मुंबई संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून रेगे यांची ओळख होती. प्रथम श्रेणीतले ५२ सामन्यांमध्ये रेगे यांनी १२६ गडी  बाद केले होते. १९७० मध्ये त्यांनी मुंबई रणजी संघाचं कर्णधारपद भूषविलं होतं.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.